■ बीड (महाराष्ट्र) ■ सायं.दैनिक ■ मराठी ■ वर्ष – ०२ ■ अंक – ३२० ■ गुरूवार दि.७ ऑगस्ट २०२५ ■ आरएनआय – एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ ■ किंमत ३ रु. । पाने ४

■ Beed (Maharashtra) ■ Daily Evening ■ Marathi ■ Year - 02 ■ Issue - 320 ■ Thursday Dt. 7 August 2025 ■ RNI : MAHMAR/2023/83965 ■ Price - 3 Rupees ■ Pages 4

# बाबरी मुंडे यांच्या एंट्रीनं राजकारणात खळबळ; अनेकांच्या पोटात दुखू लागले!

बाबरी मुंडेंना जिल्हा परिषद अध्यक्ष करा, भाजपच्या अनेक नगरसेवकांच्या हाती अजितदादांची घड्याळ

अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ
सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ
संपादक : दिपक थोरात Mob.9860898564

अजितदादा.. ग्रामपंचायत ते जिल्हा परिषदेच्या निवडणुकीपर्यंत तुमच्या पक्षाची स्थानिक संस्थांमध्ये बाबरी मुंडेंमुळे ताकद वाढली

## माजलगाव-धारूर-वडवणीच्या डोंगरपट्ट्यात बाबरी मुंडेंचा दबदबा

# बाबरी मुंडेंच्या प्रवेशाने अजितदादांच्या राष्ट्रवादीला मिळालं नवं बळ, विरोधकांच्या भुवया उंचावल्या?

## माजलगाव मतदारसंघात बाबरी मुंडेंचा जलवा; सहा स्थानिक संस्थांमध्ये राष्ट्रवादीला बळ मिळणार?

- अपक्ष असतानाही स्वतःच्या जीवावर १८ हजार मते घेणं सोपं नाही दादा, बाबरी मुंडेंना आता ताकद द्या!
- सर्व जाती-धर्मांच्या मदतीला धावणारा नेता म्हणून बाबरी मुंडे जनतेच्या मनाचा बादशहा!
- बाबरी मुंडेंच्या पाठीशी तरुणांची ताकद आणि लाडक्या बहिणींची निष्ठा; लोकप्रियतेचं नव शिखर!

**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्याच्या राजकारणात सध्या बाबरी मुंडे यांची जोरदार चर्चा आहे. त्यांच्या एन्ट्रीनं अनेकांच्या पोटात दुखायला सुरुवात झाली असून, त्यांच्या प्रभावी नेतृत्वामुळे अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला नवसंजीवनी मिळाली आहे. बाबरी मुंडे या युवा नेतृत्वाच्या प्रतिमेसोबत समाजातील विविध घटकांमध्ये लोकप्रिय असून, त्यांच्या सामाजिक कार्यामुळे त्यांना एक वेगळी ओळख प्राप्त झाली आहे. त्यांनी केलेल्या प्रवेशामुळे बीड जिल्ह्यातील राजकीय समीकरणं बदलणार, असं जाणकारांचं मत आहे. बाबरी मुंडे यांच्या रूपाने अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला ग्रामीण भागात भक्कम आधार मिळण्याची शक्यता निर्माण झाली आहे. या प्रवेशामुळे विरोधकांमध्ये अस्वस्थता पसरली असून, काही स्थानिक नेते आपली राजकीय अस्तित्व टिकवण्यासाठी धडपड करताना दिसत आहेत. आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांमध्ये बाबरी मुंडे यांच्या उपस्थितीमुळे राष्ट्रवादीला मोठा फायदा होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

माजलगाव मतदार संघामध्ये २०२४ च्या निवडणुकीमध्ये बाबरी मुंडे या नावाचा वादळ उभा होतं बाबरी मुंडे या एका कमी वयाच्या तरुणांनी माजलगाव मतदार संघामध्ये कमी वेळेमध्ये जास्त नियोजन करत सर्वसामान्याला अगोदरच जनसेवेसी नाळ जोडलेले असणारा बाबरी हा सर्वांचा आवडता आहे बाबरी मुंडेचे नेतृत्वाखाली आता अजित पवारांच्या राष्ट्रवादीचा नेतृत्व आलेला आहे अजित दादांच्या नेतृत्वाखाली आज बाबरी मुंडे राजाभाऊ मुंडे हे

पान २ वर



### अपक्ष असतानाही १८ हजार मते घेतली, बाबरी मुंडेंवर जनतेचा विश्वास अजितदादांना नव्या पर्वाचा संदेश देतोय!

माजलगाव मतदार संघामध्ये २०२४ च्या विधानसभा निवडणुकीमध्ये बाबरी मुंडे यांना माजलगाव मतदार संघाने भरभरून मतदान केले १८ ते २० हजाराचा आकडा बाबरी मुंडे यांनी गाठला तोही अपक्ष बाबरी मुंडे हा सर्वांचा आवडता व युवा नेता आहे बाबरी मुंडे सोबत अठरापगड समाजातील लोक आजही आहेत बाबरी मुंडेला फक्त वंजारीत नाही तर अठरापगड जातीतील मातंग बौद्ध मराठा साळी माळी तेली कोळी धनगर सह अठरा पगड जातीतील आज लोक बाबरी मुंडे च्या पाठीशी खंबीरपणे उभा आहेत कारण की बाबरी मुंडे यांनी सर्वांच्या सुखदुःखामध्ये धावून जात २४ तास जनसेवेसाठी वेळ दिला आहे बाबरी मुंडे ला पुढील काळामध्ये दादांनी जिल्हा परिषदेचे अध्यक्ष करावे अशी मागणी आता माजलगाव मतदार संघातून होत आहे बापरे मुंडे यांनी २०२४ मध्ये १८ ते २०००० मतदान घेतलेले दादा हे अनेकांना भाऊ वाया उंचावला लावणार आहे कारण याच १८ ते २० हजार मतात एखादा दिग्गज नेताही घेऊ शकत नाही कारण बाबरी मुंडेने अपक्ष मतदान घेतलं म्हणजे प्रकाश सोळुंखे नाही त्यांची ताकद माहिती होती त्यामुळे बाबरी मुंडे च्या पाठीशी अजित दादांनी मोठी ताकद उभा करून त्यांना जिल्हा परिषदेचे अध्यक्ष पद द्याव अशी मागणी आता माजलगाव मतदारसंघातून होत आहे.



# कोमलवाडी-भोजगाव ग्रुप ग्रामपंचायत अंतर्गत घरकुल लाभार्थ्यांची लूट!

## इंजिनिअरच्या नावाखाली पैसे उकळण्याची 'दलाल साखळी' सक्रिय?

**नवनाथ आडे । गेवराई**



भोजगाव - कोमलवाडी ग्रुप ग्रामपंचायत अंतर्गत प्रधानमंत्री आवास योजना अंतर्गत मंजूर घरकुल लाभार्थ्यांकडून इंजिनिअरच्या नावाखाली पैसे उकळण्याची दलालांची साखळी सक्रिय असल्याचे धक्कादायक वास्तव समोर येत आहे. घरकुल मंजुरीनंतर लाभार्थ्यांना मिळणारी रक्कम अडवून ठेवत, इंजिनिअरला पैसे द्या, मोजमापाशिवाय पैसे मिळणार नाहीत, फोटो काढण्यासाठी फी द्या असे सांगत स्थानिक पातळीवर काही दलाल खुलेआम पैसे वसूल करत असल्याची चर्चा सध्या सुरू आहे. काही लाभार्थ्यांनी नाव न छापण्याच्या अटीवर सांगितले की, आमच्याकडून ४ ते ५ हजार रुपये पर्यंत घेतले गेले. पैसे न दिल्यास घरकुल रक्कम थांबवण्याची धमकी देण्यात आली. इंजिनीयरला पैसे दिल्याशिवाय मोजमाप होत नाही असे सांगून आम्हाला सक्तीने पैसे द्यावे लागले, या प्रकरणामुळे घरकुल योजनेत पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांनी तातडीने लक्ष घालणे गरजेचे आहे. इंजिनिअरच्या फी' च्या नावाखाली पैसे उकळणाऱ्या दलालांची साखळी सध्या चर्चेचा विषय ठरली आहे. हा प्रकार उघडकीस आल्याने ग्रामस्थांत संतापाची लाट उसळली आहे. शासनाने गरीब व गरजूंना हक्काचे घर मिळावे या हेतूने घरकुल योजना सुरू केली. मात्र, लाभार्थ्यांना या योजनेचा संपूर्ण लाभ मिळण्याआधीच दलालांचे जाळे त्यांच्यावर पसरत आहे. काही ठिकाणी ४ ते ५ हजार रुपये 'इंजिनिअर घेईल, मोजमाप करेल, फोटो काढेल' अशा बहाण्यांनी घेतले जात असल्याची प्राथमिक माहिती मिळत आहे. या दलालांनी स्वत:ला अधिकाऱ्यांचे खबरी, एजंट व मध्यस्थ म्हणून मिरवत गावागावात खुलेआम वसुली सुरू केली आहे. शासकीय पातळीवर कोणतीही लेखी सूचनाच नसतानाही लाभार्थ्यांकडून पैसे उकळले जात आहेत, हे अत्यंत चिंताजनक आहे. या प्रकाराची उच्चस्तरीय चौकशी करून दोषींवर फौजदारी गुन्हे दाखल करावेत, अश मागणी होत असून, लाभार्थ्यांना खऱ्या अर्थाने न्याय मिळावा, यासाठी प्रशासनाने पुढाकार घ्यावा, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. तसेच या प्रकरणात आता मोठा खुलासा होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. या दलालांची नावे लवकरच उघडकीस येणार असल्याची माहिती खात्रीशीर सूत्रांकडून समजली असून, गावकऱ्यांमध्ये यामुळे प्रचंड खळबळ माजली आहे. आता सर्वांचे लक्ष या दलालांची नावे जाहीर होण्याकडे लागले आहे.



**घरकुल लाभार्थ्यांकडून आर्थिक लूट करणाऱ्या दलालांची नावे लवकरच होणार जाहीर?**

### घरकुल लाभार्थ्यांकडून पैसे वसूल करणारा दलाल कोण?

इंजिनिअरच्या नावाखाली सुरू असलेल्या या वसुली प्रकरणात एक किंवा अधिक दलालांचा सक्रिय सहभाग असून, लाभार्थ्यांकडून ४ ते ५ हजार रुपयांची बिनधास्त मागणी केल्या जात असल्याची प्राथमिक माहिती मिळत आहे. त्यामुळे आता कोमलवाडी आणि भोजगाव येथे पैसे वसूल करणारा दलाल कोण? हा प्रश्न अधिक तीव्र होत चालला आहे. या दलालाची ओळख पटवून त्याच्यावर कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी आता जोर धरत आहे. तसेच संबंधित अधिकारी आणि ग्रामपंचायत सदस्यांनी या प्रकरणाकडे गांभीर्याने लक्ष देऊन लवकरात लवकर या 'दलाल साखळी'चा पर्दाफाश करावा, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.



## वैद्यनाथ बँकेच्या निवडणुकीच्या प्रचारार्थ प्रीतमताई मुंडे यांची समर्थ मठ केज येथे उपस्थिती

**केज । प्रतिनिधी**

केज येथे दि.०६ ऑगस्ट रोजी वैद्यनाथ बँकेच्या निवडणुकीच्या प्रचारार्थ भाजपाच्या प्रदेश उपाध्यक्षा मा.खासदार डॉ.प्रितमताईसाहेब मुंडे या समर्थ मठ केज येथे लोकनेते गोपीनाथराव मुंडे जनसेवा पॅनलच्या प्रचारासाठी आल्या असता ताईसाहेबांचे जंगी स्वागत करण्यात आले. यावेळी ताईसाहेबांनी लोकनेते गोपीनाथराव मुंडे जनसेवा पॅनेलच्या सर्व उमेदवारांना विजयी करण्याचे आवाहन केले.

याप्रसंगी जेष्ठ नेते रमेशराव आडसकर, युवा नेते अक्षय भैय्या मुंदडा, राम कुलकर्णी, संतोष दादा हांगे, सभापती विष्णू भाऊ घुले, डॉ. वासुदेव नेहरकर, भगवान केदार, अंकुशरावजी इंगळे, सुनिल आबा गंलाडे, राणा डोईफोडे, योगिनीताई थोरात, रमाकांत बापू मुंडे, शरद भैय्या इंगळे यांसह पदाधिकारी, कार्यकर्ते व बँकेचे सभासद उपस्थित होते.



आज पिंपळनेर येथे काँग्रेसची शाखा उद्घाटन करताना गणेश दादा बजगुडे, नवनाथ बाप्पू थोटे, पिनू राजे डांगे

## विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर, क्रांतीसुर्य महात्मा फुले, अण्णाभाऊ साठे यांच्या पुतळ्याचे आधुनिक पद्धतीने सुशोभिकरण करा

### नगरसेवक ॲड. विकास जोगदंड यांची निवेदनाद्वारे मागणी

**बीड । प्रतिनिधी**

६ ऑगस्ट तमाम भारतीयांचे उद्धारक भारतीय संविधानाचे शिल्पकार विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पेठ बीड भागात मध्यवर्ती ठिकाणी पुतळा असुन सदरच्या पुतळयाचे काम अंदाजे गेल्या पन्नास ते साठ वर्षापूर्वी झाले आहे. पुतळ्या समोरील मुख्य रस्त्याचे सिमेंटीकरण झाल्यामुळे, पुतळ्याचे संरक्षण भिंतीची उंची खुजी झाली असून, पुढील काही वर्षात पुतळ्याचे बांधकाम व संरक्षण भिंती जीर्ण होण्याची शक्यता नाकारता येणार नाही.! भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर हे संबध भारतीयांचे उद्धारकर्ते असुन समाज बांधव, आजी, माजी लोकप्रतिनिधी यांच्या वतीने पुतळ्याचे सुशोभीकरण करणे बाबत वारंवार प्रशासकीय स्तरावर मागणी केली जात आहे.



समाज बांधवांच्या भावनेचा आदर करून पुतळयाचे प्रशस्त अशा आधुनिक पद्धतीने नूतनीकरण करून सुशोभिकरण करण्यात यावे तसेच, १८ व्या शतकात स्त्रियांना मुक्तीचे द्वारे खुले करून देणारे सत्यशोधक चळवळीचे प्रणेते राष्ट्रपिता ज्योतिबा फुले व सावित्रीबाई फुले यांचे पुतळे सारडा कॅपिटल इथे स्थित असून तसेच कष्टकरी कामगारांच्या व्यथा वेदना आपल्या साहित्यातून मांडणारे, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचा पुतळा बीड शहरातील साठे चौक या मुख्य मार्गांवर असून पुतळ्याचे बांधकाम तसेच संरक्षण भिंत देखील जीर्ण होत आहे. विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर व महात्मा ज्योतिबा फुले, सावित्रीबाई फुले आणि लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांच्या पुतळ्यांचे प्रशस्त आधुनिक पद्धतीने सृशोभिकरण करण्यात आल्यास बीड शहरातील सामाजिक व सांस्कृतिक वैभवात आणखी भर पडेल.

विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळयास व महात्मा ज्योतिबा फुले व सावित्रीबाई फुले आणि लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या पुतळ्यास प्रशस्त असे आधुनिक पद्धतीने नूतनीकरणा साठी निधी मंजुर करुन सुशोभिकरण करण्यात यावे अशी मागणी तमाम बीड शहरातील बहुजन समाजातील माता, भगिनीं, बांधवांच्या वतीने राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ योगेश क्षीरसागर यांच्या नेतृत्वाखाली भिम स्वराज्य सेनेचे संस्थापक/अध्यक्ष तथा नगरसेवक ॲड विकास जोगदंड यांचे सह शिष्टमंडळाने निवेदनाद्वारे केली आहे.

## मेजर संदीप घुमरे यांचा सेवापूर्ती सोहळा मोठ्या थाटात संपन्न

**आष्टी । प्रतिनिधी**

तालुक्यातील घाटा पिंपरी येथील संदीप श्रीरंग घुमरे यांचे सैन्य दलातील सेवा पूर्ण झाली व ते सेवानिवृत्त झाले त्यांच्या सेवापूर्ती गौरव सोहळा अहिल्यानगर येथून कोहिनूर लॉन्स येथे मोठ्या थाटा संपन्न झाला त्यांचे अहिल्यानगर रेल्वे स्टेशन येथे आगमन होताच सगे सोयरे मित्र परिवारांनी फटाक्याची अतिश बाजी करत स्वागत केले. सत्कार प्रसंगी बोलताना ते म्हणाले की जो व्यक्ती सैन्य दलात भरती होतो. त्यावेळी त्याच्यावर देशाचे संरक्षण करण्याची पद्धती जबाबदारी असते हे काम करावे लागते परंतु आई-वडील पत्नी मित्रपरिवार त्यांच्या सर्वांनी आजपर्यंत सेवा केली.

आज सेवेतून निवृत्त होऊन आज सेवापुर्ती सोहळा आला तुमच्यासमोर उपस्थित आहे ते २००४ मध्ये उठझ्र मध्ये भरती झाली. नऊ महिन्याचे ट्रेनिंग करून त्यांची पहिली पोस्टिंग अरुणाचल प्रदेश येथे झाली अशा विविध ठिकाणी त्यांनी त्यांचे कार्य बजावले. या कार्यक्रमाप्रसंगी संजय गाढवे, माजी सरपंच धामणगाव विजय गाढवे, तालुका अध्यक्ष राष्ट्रवादी काँग्रेस बाळासाहेब निकम, बाळासाहेब पिसाळ, अंकुश तळेकर, विनायक मुळीक, सरपंच दिसले गुरुजी, भरत शेठ पोकळे, जिल्हा टायगर फोर्स वैभव थोरवे, वनवे साहेब, बबन तळेकर, सतीश चौधरी सर, जय वामनभाऊ उद्योग समूह संस्थापक अध्यक्ष अहिल्यानगर ओंकारश्वर शुगर फॅक्टरी चे एमडी डिसले साहेब आणि अनिल सोनवणे बिल्डर आकाश शेठ बारस्कर सागर शेठ देशमुख अंकुश शेठ आजी माजी सैनिक असे विविध सामाजिक राजकीय सांस्कृतिक क्षेत्रातील मान्यवर यावेळी उपस्थित होते. त्यांचे वडील श्रीरंग किसन घुमरे आई बाई यांचे दर्शन घेऊन कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली. आलेल्या उपस्थित मान्यवरांना जेवणाचा कार्यक्रम ही त्यांनी आयोजित केला होता या ठिकाणी कीर्तन सोहळा ही त्यांनी ठेवला होता.

## ना. पंकजाताई मुंडेंचा मध्यप्रदेशात पर्यावरण विषयक अभ्यास दौरा; 'स्वच्छ महाराष्ट्र' मोहिमेला मिळणार नवी दिशा

### इंदौर शहरातील स्वच्छता आणि सॉलिड वेस्ट मॅनेजमेंटचा घेतला आढावा

**इंदौर (म.प्र.) । प्रतिनिधी**

महाराष्ट्राच्या पर्यावरण मंत्री पंकजाताई मुंडे पर्यावरण विषयक अभ्यासासाठी मध्यप्रदेश दौर्यावर असून देशातील सर्वात स्वच्छ शहर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या इंदौरला त्यांनी आज येथे भेट देत शहरातील ठोस कचरा व्यवस्थापन (सॉलिड वेस्ट मॅनेजमेंट) प्रणालीची माहिती व आढावा घेतला. स्वच्छता, पर्यावरण आणि शहर व्यवस्थापनासंदर्भात महत्त्वपूर्ण मुद्द्यांवर येथील अधिकाऱ्यांसमवेत विस्तृत चर्चा केली. पंकजाताई यांच्या या अभ्यास दौर्यातून 'स्वच्छ महाराष्ट्र' मोहिमेला नवी दिशा मिळणार आहे.



देशातील सर्वात स्वच्छ शहर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या इंदौर येथे पंकजाताई मुंडे यांनी बैठकीस उपस्थित राहून स्वच्छता, पर्यावरण आणि शहर व्यवस्थापनासंदर्भात महत्त्वपूर्ण मुद्द्यावर सविस्तर चर्चा केली. या बैठकीस इंदौरचे महापौर पुष्पमित्र भार्गव, आयुक्त शिवम वर्मा तसेच महापालिकेचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. इंदौर महानगरपालिका प्रशासनाकडून करण्यात येणाऱ्या स्वच्छतेच्या उपाययोजनांची माहिती यावेळी देण्यात आली. त्याचबरोबर पंकजाताई मुंडे यांनी कबीट खेड़ी येथील सिव्हरेज ट्रीटमेंट प्लांटला भेट देत, तिथे करण्यात येणाऱ्या अपशिष्ट जलाच्या प्रक्रियेची आणि त्याच्या पुनर्वापराबाबतच्या यंत्रणांची सविस्तर माहिती घेतली. अपशिष्ट जलाचा शाश्वत आणि परिणामकारक वापर कसा करता येतो, याचे प्रत्यक्ष उदाहरण इंदौरमध्ये पाहायला मिळाल्याचे पंकजाताई मुंडे यांनी यावेळी नमूद केले. पर्यावरण विभागाच्या सचिव जयश्री भोज यावेळी त्यांच्यासमवेत उपस्थित होत्या.

या दौऱ्या दरम्यान महाराष्ट्रातील शहरी भागात स्वच्छता आणि पर्यावरण विषयक उपाययोजना अधिक प्रभावीपणे राबवता याव्यात यासाठी इंदौरच्या यशस्वी मॉडेलचा अभ्यास करण्यात आला. या भेटीत महाराष्ट्र व मध्यप्रदेशच्या जनप्रतिनिधींसह दोन्ही राज्यातील संबंधित विभागांचे अधिकारी व कर्मचारीही उपस्थित होते.

## चौसाळा येथील सामाजिक कार्यकर्ते अरुण सोनवणे यांचे अल्पशा अजाराने निधन

**चौसाळा । प्रतिनिधी**



बालाघाटावरील चौसाळा येथिल सामाजिक कार्यकर्ते अरुण (अण्णा) सोनवणे वय वर्षे (५७) यांचे आज पहाटे अल्पशा अजाराने निधन झाले ते शिवसेना तालुका संघटक विशाल सोनवणे यांचे वडील होते. अरुण सोनवणे यांच्या पश्चात पत्नी दोन मुले असुन सोनवणे परिवाराच्या दुखात सांय दैनिक महाराष्ट्र आरंभ परिवार सहभागी आहे.

## रोज धुळीत मिसळणारी जनता नगर सेवक ते आमदार स्वच्छता कर्मचारी ते मुख्याधिकारी यांना दिसत नाही का ? शिवक्रांती सेना संघटना

**बीड । प्रतिनिधी**

बीड नगर पालिकेच्या गलथान कारभाराचा त्रास बीडकरांना होत आहे. मात्र या संदर्भात कोणालाही काहीही देण घेण नही. कारण गेल्या दोन वर्षापासून बीडमध्ये घंटागाडी येत नाही. एकदाही या संदर्भात सामान्य नागरिकांनी ना मुख्याधिकाऱ्यांना, ना नगरसेवकांना जाब विचारला. रस्त्यावर प्रचंड धूळ, मोठ मोठे खड्डे, नाल्या तुंबल्याने ज्यांच्या घरात पाणी शिरते.

बीड शहरातील जनता रोज धुळीने माखलेल्या रोड ने फिरती अनेकांना



श्वसनाचे विकार वाढले लेकरांपासुन ते ज्येष्ठांपर्यंत सर्व धुळीमुळे फक्त दवाखान्याचे चकरा मारतात त्यातली त्यात टिपर वाल्यांनी फुपाटा ऊडवत हैदोस घातला तरी पण आजी माजी नगरसेवक ते आमदार यांना आपण मतदान मागतो त्या जनतेचे देणं घेणं नाही फक्त निवडनुका दिसल्या कि जनता व मतदार अठवतो पण निर्लज्ज नगरसेवक हे स्वताच्या पक्षाचा मंत्री आला की शहर भर बैनर लावत मिरवतात व ज्या रोड ने त्यांचा नेता जाणार ते रोड पार स्वताच्या कपड्याने पुसायची तयारी असते जर असे असेल तर उपमुख्यमंत्री अजित दादा पवार तुम्ही दिवसा आड बीड शहरात या बीड कर आपले रुणी असतील असे शिवक्रांती सेना संघटनेचे बीड जिल्हा अध्यक्ष विशाल इंगोले यांनी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकाद्वारे केले आहे.



महसूल मंत्री ना.चंद्रशेखर बावनकुळे साहेब धाराशिव प्रवासा दरम्यान बीड येथे काही वेळ थांबले. यावेळी ना.पंकजाताई मुंडे व जिल्हा भाजपचे वतीने सत्कार जिल्हाध्यक्ष शंकररावजी देशमुख यांनी केला. यावेळी विक्रांत हजारी, सुनील मिसाळ, अदित्य सारडा, शांतीनाथ डोरले, श्रीकांत सानप, ॲड. उद्धव रासकर, बालाजी पवार, अमोल वडतीले, महादेव नागरगोजे, सदाशिव वनवे, केशव बडे आदी पदाधिकारी उपस्थित होते.

## जनतेचा आवाज ठरलेले नेतृत्व शिवसेनेचे मा.जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते



शिवसेनेचे माजी जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते सर यांना वाढदिवसाच्या मनःपूर्वक खूप खूप शुभेच्छा. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे खंदे, निष्ठावान आणि जनतेच्या मनामनात घर करणारे माजी जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते सर यांचा वाढदिवस म्हणजे संपूर्ण जिल्ह्यासाठी साजरी करणारी एक प्रेरणादायी पर्वणीच होय. सातपुते सर यांनी आपल्या नेतृत्वात, जिद्दीने, चिकाटीने आणि कार्यकर्त्यांना सतत बळ देत शिवसेनेच्या कार्याचा झेंडा बुलंद ठेवला. जिल्ह्याच्या कानाकोपऱ्यातून सामान्य जनतेसाठी लढा देणारा, त्यांच्या अडचणींना आपल्या प्रश्नांप्रमाणे हाताळणारा एक कार्यकर्ता म्हणून सरांनी स्वतःला सिद्ध केले. केवळ पक्षासाठी नव्हे तर समाजासाठी, शेतकरी, कामगार, युवक, महिला यांच्यासाठी एक विश्वासू आधारस्तंभ म्हणून त्यांचं योगदान लक्षणीय आहे.

त्यांचे कार्यकर्त्यांवरचं प्रेम, संकटसमयी दिलेला आधार, प्रत्येक निर्णयामागची लोकहिताची भावना, हेच त्यांच्या यशाचं गमक आहे. शिवसेनेच्या मूल्यांशी एकनिष्ठ राहून त्यांनी अनेक संकटांचा सामना केला, पण कधीही आपली निष्ठा आणि विचारसरणी डगमगू दिली नाही.

सर हे केवळ राजकारणातील एक नेते नसून, समाजकारण, शैक्षणिक, सांस्कृतिक क्षेत्रातही त्यांनी मोलाची कामगिरी केली आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली अनेक युवकांनी राजकारणात, समाजकारणात आपली वेगळी ओळख निर्माण केली. त्यांचा सल्ला, सहकार्य आणि अनुभव आजही नव्या पिढीच्या वाटचालीला दिशा देतो.

आज त्यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांच्या कार्याची उजळणी होत आहे. त्यांच्या जीवनातील हा विशेष दिवस त्यांना उत्तम आरोग्य, दीर्घायुष्य आणि अजून अधिक यशाचे शिखर गाठवो, हीच ईश्वरचरणी प्रार्थना. परमेश्वर सातपुते सर हे एक विचारवंत, जडणघडण करणारे नेतृत्व, आणि निष्ठेचा खरा अर्थ समजावणारे व्यक्तिमत्त्व आहे. त्यांच्या पुढील वाटचालीस मनःपूर्वक शुभेच्छा देताना, आम्हाला आनंद वाटतो की असे एक सच्चे नेते आपल्या जिल्ह्याला लाभले आहेत.

परमेश्वर सातपुते सर, यांना वाढदिवसाच्या मनःपूर्वक हार्दिक शुभेच्छा! आपल्या नेतृत्वाखाली जिल्हा नेहमीच प्रगतीच्या दिशेने वाटचाल करत राहो, हीच अपेक्षा.

**अभिजीत जिजाभाऊ चिंचकर**




## डॉ. अण्णाभाऊ साठे यांची १०५ वी जयंती केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांच्या उपस्थितीत दिल्लीत साजरी

**बीड । प्रतिनिधी**

लोकशाहीर डॉ अण्णाभाऊ साठे यांची १०५ वी जयंती नवी दिल्ली येथील नवीन महाराष्ट्र सदन येथे सार्वजनिक जयंती उत्सव समिती २०२५ नवी दिल्ली च्या वतीने साजरी करण्यात आली. या जयंती निमित्त संपूर्ण देशातील विविथ क्षेत्रात समाजिक कार्य करणाऱ्या ५० समाज बांधवांचा सन्मान केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांच्या शुभ हस्ते करण्यात आला.दिल्ली येथे नवीन महाराष्ट्र सदन येथे जयंतीची सुरुवात माजी आ रामभाऊ गुंडीले, आनंद शिंदे या समाज बांधवानी सुरुवात केली होती त्याचं परंपरेला पुढे चालू ठेवन्याच काम औसा लातूर येथील रहिवाशी विनोद जाधव यांनी केले आहे.

असेच जर वर्षी ही परंपरा प्रत्येक समाज बांधवाच्या रूपाने सुरूच राहील असे विनोद जाधव यांनी सांगितले आहें. यां जयंती निमित्त केंद्रीय मंत्री रामदास आठवले, अनुसूचित जाती मोर्चाचे राष्ट्रीय अध्यक्ष लालसिंह आर्या, राज्यसभेचे खासदार डॉ अनिल कुमार बोन्डे, मा खा डॉ सुनील गायकवाड, मा आ रामभाऊ गुंडीले, राहुल कांबळे, तामिळनाडू चे भाजपा पदाधिकारी अंबलय्या शिवकुमार, एन एल नागराज, पाडियाराज उपस्थित होते. लोकशाहीर डॉ अण्णाभाऊ साठे सार्वजनिक जयंती उत्सव समिती नवी दिल्ली आयोजन समिती चे प्रमुख काकासाहेब मोरे, समितीचे अध्यक्ष विनोद जाधव, कमलेश गायकवाड, हुमा चौधरी, भावना त्रिपाठी, राजकिरण साठे, फय्युम शेख, शकुंतला कश्यप, इरम जैदी, मनोज जाधव, सुरज शिंदे उपस्थित होते.

पान १ वरून...

## बाबरी मुंडेंच्या प्रवेशाने अजितदादांच्या राष्ट्रवादीला मिळालं नवं बळ, विरोधकांच्या भुवया उंचावल्या?

प्रवेश करत आहेत परंतु आज बाबरीच्या नेतृत्वामुळे अनेक तरुण रस्त्यावरती उतरला आहे आणि अजित पवारांचे राष्ट्रवादीचा झेंडा हाती घेतलेला आहे तर राजकीय तडजोड करणाऱ्या नेत्यांपैकी बाबरी मुंडे नाही एकनिष्ठ कार्यकर्ता व त्या नेत्याच्या पाठीशी खंबीरपणे उभा राहून साम-दाम दंड भेद या सर्व बाजूने आपल्या काम करण्याची पद्धत बाबरीची आहे बाभळीची काम करण्याची पद्धत म्हणजे सर्वसामान्यांच्या मदतीला आजही उभा राहणे गरजेचे आहे हेच ब्रीदवाक्य घेऊन प्रत्येकाच्या सुखदुःखामध्ये धावणारा बाबरी मुंडे आज अजित पवारांच्या राष्ट्रवादीचा झेंडा घेऊन आपलं शक्ती प्रदर्शन वडवणी शहरांमध्ये करत आहेत माजलगावचे आमदारांना बाबरी मुंडे मुळे फायदा होऊ शकतो परंतु अनेकांना बाबरी मुंडे मुळे आपलं नुकसान होऊ शकतं असं वाटत आहे त्यामुळे अनेकांना बाबरी मुंडेच्या प्रवेशामुळे पोटदुखी सुरू झाली आहे बाबरी मुंडे चा परिणाम हा आता थेट मतदानाच्या पेटीतून बाहेर येईल त्यामुळे भाजपला आता अनेक ठिकाणी आपले बालेकिल्ले असलेले गाव हे आता त्या ठिकाणी बाबरी मुंडेच्या राष्ट्रवादीच्या प्रवेशाने सुरू लागलेला आहे परंतु अजित दादांच्या राष्ट्रवादीला याचं बळ मिळालेला आहे आणि अजित दादांच्या राष्ट्रवादीला वडवणी माजलगाव आणि धारूर या तिन्ही तालुक्यातील डोंगरदऱ्यांमध्ये आज बाबरी मुढे च्या नावाचं वार आज सुसाट वेगाने वाहू लागला आहे त्यामुळे आज अजित दादांच्या राष्ट्रवादीला खूप मोठे बळ मिळालेला आहे यात तिळमात्र शंका नाही. स्वर्गीय गोपीनाथरावजी मुंडे साहेब यांच्या गेल्या ३५ ते ४० वर्षाच्या राजकारणामध्ये राजाभाऊ मुंडे हे नाव खूप जवळचं होतं काही कान किचक्या कार्यकर्त्यांमुळे भाजपमध्ये नेत्यांनी त्या कार्यकर्त्यांचा ऐकून बाबरी मुंडेंना थोडसं बाजूलाच सारण्याचा प्रयत्न केला परंतु तो आज भाजपच्या मुळावर उठला आहे भाजपचा आज वळून तालुक्यामध्ये सापळा झाल्याची चर्चा नागरिकांमध्ये आहे परंतु बाबरी मुंडे राजाभाऊ मुंडे यांच्या नेतृत्वाखाली आजरा राष्ट्रवादीला बळ मिळालं आणि भाजप पुन्हा एकदा बीड जिल्ह्यामध्ये मागे पडलं का असावा आता जनतेच्या मनामध्ये पडला आहे.

# मतदारसंघातील रस्ते आणि विविध विकास कामासंदर्भातील आ.क्षीरसागरांच्या मागण्यांना ना.अजितदादांची सकारात्मकता

# महामार्गसाठी भूसंपादन झालेल्या शेतकऱ्यांना मावेजा देण्याचीही केली मागणी

**बीड । प्रतिनिधी**

बीड विधानसभा मतदारसंघातील रस्ते आणि इतर विकास कामांच्या संदर्भात आ.संदीप क्षीरसागर यांनी ना.अजित दादा पवार यांच्याकडे मागणी केली असता, ना.अजितदादांनी लगेचच संबंधित अधिकाऱ्यांना समोरासमोरच सूचना देऊन बीड विधानसभा मतदारसंघाच्या विकासासाठीची सकारात्मकता स्पष्ट केली. महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री ना.अजितदादा पवार २ दिवस बीडमध्ये आलेले आहेत. या दोन दिवसांत ना.अजितदादांनी जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने अनेक प्रश्न आणि बाबींकडे बैठकांच्या माध्यमातून नियोजन सुरू केले आहे. या अनुषंगाने गुरूवारी (दि.७) रोजी झालेल्या बैठकीत आ.संदीप क्षीरसागर यांनी बीड विधानसभा मतदारसंघातील विकासाचे विविध प्रश्न आणि प्रस्ताव बैठकीत ना.अजितदादांसमोर मांडले असता, ना.अजितदादांनी जागेवरच संबंधित अधिकाऱ्यांना प्रस्तावांच्या संदर्भात सकारात्मक सूचना दिल्या.

**ना.अजितदादांनी पुढील कामांबाबत**



**दर्शवली सकारात्मकता**

राष्ट्रीय महामार्ग २११ (नवीन क्र.५२) महालक्ष्मी चौक ते जालना रोड ते छत्रपती शिवाजी महाराज चौक रस्ता या दोन्ही साईडने सहा (६) लाईन रोडसाठी व दोन्ही साईडने ड्रेनेजसाठी मा.अजित दादांनी सार्वजनिक बांधकाम विभागाला सूचना दिल्या. शिवशारदा ते अमरधाम स्मशानभुमी पर्यंत भुयारी गटारसाठी मा.दादांनी तत्त्वत: सूचना दिल्या. ग्रामीण भागातील मुख्य रस्ते, प्राथमिक आरोग्य केंद्रे, उपकेंद्रे, शाळा खोली, अंगणवाडी बांधकाम, पाणी पुरवठा व्यवस्था, जनसुविधे अंतर्गत स्मशानभुमी बांधकाम, पशु वैद्यकीय दवाखाने, वन विभागाचा विकास, कोल्हापुरी पद्धतीने बंधरे, सिमेंट नाला बंधारे या व इतर आवश्यक असलेले विकास कामे होणे बाबत आ.क्षीरसागरांनी निवेदनासह मागणी केली असता ना.अजितदादांनी सकारात्मकता दर्शविली.

**बीड शहरातील जिव्हाळ्याचा असलेला रस्त्यांचा प्रश्नही मार्गी लावण्याची केली मागणी**

बीड शहरातील अनेक रस्त्यांची दुरावस्था झाली आहे. शहरातील रहदारीसाठी रस्त्यांच्या अवस्थेमुळे मोठी अडचण होत आहे. बीड शहरातील रस्त्यांचा प्रश्न हा नागरिकांच्या दृष्टीने जिव्हाळ्याचा झाला आहे. त्यामुळे ना.अजितदादांकडे शहरातील रस्त्यांचा विकासासंदर्भात प्रस्ताव देऊन आ.क्षीरसागर यांनी बीड शहरातील रस्त्यांचा प्रश्न मार्गी लावण्याची मागणी केली आहे. आ.क्षीरसागर यांनी पालवण चौक ते नगर रोड (धानोरा रोड), मदर टेरेसा चौक ते कालिका नगर कमान (अंकुशनगर मुख्य रस्ता), बीड न.प.अंतर्गत प्रभाग क्र. ७ मध्ये बलभीम चौक ते धोंडीपुरा मार्गे माळीवेस सिमेंट रस्ता करणे, बीड न.प.अंतर्गत प्रभाग क्र.८ छत्रपती शिवाजी महाराज पुतळा ते राजुरी वेस पर्यंत सिमेंट रस्ता व नाली बांधकाम करणे, बीड न.प.अंतर्गत प्रभाग क्र.०८ मध्ये कारंजा टावर ते पिंगळे गल्ली ते बुंदेलपुरा मस्जिद रोड पर्यंत सी.सी. रस्ता व नाली बांधकाम करणे, बीड न.प.अंतर्गत प्रभाग क्र.०८ मध्ये राजुरी वेस ते बलभीम चौक व राजुरी वेस बुंदेलपुरा मार्ग कबाड गल्ली पर्यंत सी.सी.रस्ता व नाली बांधकाम करणे, बीड न.प.अंतर्गत प्रभाग क्र.८ मध्ये राजुरीवेस-बुंदेलपुरा-कबाडगल्ली मार्गे माळीवेस सिमेंट रस्ता करणे. या कामांना मंजुरी देण्याची मागणी आ.संदीप क्षीरसागर यांनी ना.अजितदादा पवार यांच्याकडे केली आहे.

**राष्ट्रीय महामार्ग ३६१ एफ खरवंडी ते राजूरी (न.) रस्त्याच्या भूसंपादनचाही मांडला प्रश्न**

बीड मतदारसंघातून राष्ट्रीय महामार्ग ३६१ एफ गेला आहे. या महामार्गासाठी खरवंडी ते राजूरी नवगण पर्यंत अनेक शेतकऱ्यांच्या जमिनीचे भूसंपादन करण्यात आले आहे. परंतु संपादनाचा शेतकऱ्यांना मावेजा मिळालेला नाही. विकास कामांसाठी शासनाला जमीन संपादित करूनही मावेजावाचून शेतकरी बांधवांचे अतोनात हाल होत आहेत. याबाबत अनेकवेळा पाठपुरावा करूनही प्रश्न मार्गी लागत नसल्याने ना.अजितदादांनी हा प्रश्न मार्गी लावून जमीन संपादित झालेल्या शेतकरी बांधवांना दिलासा देण्याची मागणीही आ.संदीप क्षीरसागर यांनी निवेदनाद्वारे केली आहे.

# आडस, होळ, बनसारोळा, युसुफवडगाव, चनई, मोरेवाडी ग्रामपंचायतींना नवीन इमारतीसह नागरी सुविधा कक्ष मंजूर

## आ. नमिता मुंदडा यांच्या पाठपुराव्याला यश

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**



राज्यातील ग्रामीण भागातील प्रशासनाला आाला आधुनिक आणि सुसज् पायाभूत सुविधा मिळाव्यात या उद्देशाने राज्य सरकारने ५०० नव्या ग्रामपंचायत इमारतींच्या बांधकामास मंजुरी दिली आहे. या यादीत केज विधानसभा मतदार संघातील आडस, होळ, बनसारोळा, युसुफवडगाव चनई आणि मोरेवाडी या ग्रामपंचायतींचाही समावेश आहे. विशेष म्हणजे, या प्रस्तावासाठी केज विधानसभा मतदार संघाच्या आमदार नमिता मुंदडा यांनी सातत्याने पाठपुरावा केला होता. त्यांच्या प्रयत्नाना आता यश आले असून, शासनाच्या या निर्णयामुळे या भागातील ग्रामपंचायतींना सुसज्ज व आधुनिक पायाभूत सुविधा मिळणार आहेत.

पुनर्रचित राष्ट्रीय ग्रामविकास अभियान अंतर्गत सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात ही कामे हाती घेण्यात येणार आहेत. या योजनेतून नव्या ग्रामपंचायत इमारतींसोबत नागरी सुविधा कक्षाची उभारणी केली जाणार आहे. या ठिकाणी नागरिकांना जन्म मृत्यू दाखले, दाख जात प्रमाणपत्रे, पाणीबिल भरणा, निवडणूक ओळखपत्रासंदर्भातील सेवा आदी अनेक शासकीय सेवा मिळणार आहेत. त्यामुळे गावातील प्रशासन अधिक कार्यक्षम आणि लोकाभिमुख होणार आहे.

या योजनेसाठी केंद्र आणि राज्य शासनाच्या निधीचे प्रमाण अनुक्रमे ६० टक्के व ४० टक्के असे राहणार आहे. यातून ग्रामपंचायत इमारतीसाठी २० लाख रुपये आणि नागरी सुविधा खोलीसाठी ठी ५५ लाख लाख रुपये असा एकूण २५ लाखांचा निधी प्रत्येक ग्रामपंचायतीसाठी मंजूर करण्यात आला शे आहे. सदर निर्णयामुळे या गावातील प्रशासनाची गुणवत्ता सुधारण्यास मदत होणार असून डिजिटल सेवांचा ग्रामीण भागात प्रसार होणार आहे. स्थानिक नागरिकांसाठी ही सुविधा मोठी दिलासादायक सुरुवात्त ठरणार आहे. याबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे, पर्यावरण मंत्री पंकजाताई मुंडे यांचे आ. नमिता मुंदडा यांनी आभार मानले आहेत.

# अंमळनेर सर्कल मधून सुरेश पाटलांना उमेदवारी द्या..!

## आ. सुरेश धस यांच्याकडे मतदार संघातील समर्थकांची जोरदार मागणी

**अंमळनेर । प्रतिनिधी**

अंमळनेर जिल्हा परिषद गटात आगामी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका जवळ आल्याने राजकीय हालचालींना वेग आला आहे. या पार्श्वभूमीवर माजी मंत्री तथा विद्यमान आमदार सुरेश आण्णा धस यांच्या कडे मतदार संघातील जरांगे पाटील समर्थक आणि अण्णांचे निष्ठावान कार्यकर्ते समाजसेवक सुरेश पाटील यांना जिल्हा परिषद गटातून उमेदवारी द्या, अशी जोरदार मागणी करत असून समाजसेवक सुरेश पाटीलच अंमळनेर गटात योग्य उमेदवार असल्याचे सांगत आहेत. सुरेश पाटील गेल्या अनेक वर्षांपासून सामाजिक कामासह पत्रकारिता क्षेत्रात आमदार सुरेश धस यांच्या सोबत कार्यरत आहेत. त्यांच्या विषयी लोकांमध्ये प्रचंड विश्वास असून समाजसेवेच्या माध्यमातून सर्व जनतेच्या वैक्तिक व सार्वजनिक समस्या, शासकीय योजना, लोकांपर्यंत पोहोचवण्याचे काम, आणि सामाजिक प्रश्नांवर त्यांनी घेतलेली भुमिका त्यामुळे पत्रकार सुरेश पाटील यांना अमळनेर जिल्हा परिषद गटात पसंती मिळत



असून सर्व समाजाचे प्रतिनिधी व समर्थक सुरेश पाटीलच सर्कलचा विकास करू शकतात असा विश्वास धस आण्णांना देत असून आमच्या गावासह अमळनेर गटाचा विकास सुरेश पाटीलच करू शकतात अशा विश्वास वाटत असल्यामुळे त्यांना या गटाची उमेदवारी द्या..! अशी मागणी करताना दिसतात.

सुरेश पाटीलच खरे समाजसेवक आहेत. त्यांनी गावोगाव फिरून जनतेच्या अडी अडचणी सोडवण्याचा प्रयत्न केलेला आहे. त्यामुळे खऱ्या समाजसेवकाला आता संधी मिळाली पाहिजे.! अशी भावना अनेक ग्रामस्थ आणि कार्यकर्त्यांनी व्यक्त केली आहे. आमदार सुरेश आण्णा धस हे नेहमी सामाजिक कार्यकर्त्यांना न्याय देण्याचे काम करतात. १०० % टक्के समाजकारण करणारे सुरेश आण्णा धस सामाजिक क्षेत्रात काम करणारे तसेच पत्रकारतेच्या माध्यमातून समाजसेवा करणारे सुरेश पाटील यांना उमेदवारी देवून समाजकारणाला प्राधान्य देतात का.? याकडे सर्व अमळनेर सर्कल मधील जनतेचे लक्ष लागले असून सुरेश पाटील यांना उमेदवारी देऊन अंमळनेर गटाला सक्षम करावे, अशी मागणी जोर धरू लागली आहे.



# लिंबागणेश येथे पोलिस प्रशासनाच्या प्रमुख उपस्थितीत वृक्षारोपण : डॉ.गणेश ढवळे

**लिंबागणेश । प्रतिनिधी**

हरित महाराष्ट्र अभियानाच्या पार्श्वभूमीवर राबविण्यात येणाऱ्या 'हरित बीड' या संकल्पनेतून आज दि.७ गुरुवार रोजी उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजितदादा पवार यांच्या हस्ते खंडेश्वरी परिसरात वृक्षारोपण करण्यात येणार आहे. या अभियानात जिल्हा प्रशासनाने वर्षभरात १ कोटी वृक्षलागवडीचा संकल्प केला असून, आज एकाच दिवसात ३० लाख झाडांची लागवड करून हा विक्रम इंडियन बुक ऑफ रेकॉर्ड मध्ये नोंदवण्याचा मानस आहे. त्यानुसार जिल्हाधिकारी कार्यालयाने जिल्हा प्रशासन, शासकीय संस्था आणि सामाजिक संघटनांना विशेष सूचना देत वृक्षलागवडीत सामूहिक सहभागाचे आवाहन केले आहे.

या मोहिमेअंतर्गत बीड तालुक्यातील लिंबागणेश ग्रामपंचायतच्या वतीने सार्वजनिक स्मशानभूमी, गणेश मंदिर, ग्रामपंचायत परिसर या ठिकाणी वृक्षारोपण करण्यात आले. याप्रसंगी नेकनूर पोलिस स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षक आप्पासाहेब रोकडे, नेकनूर पोलिस चौकीचे सहाय्यक फौजदार बाबासाहेब राख, तसेच पिंपळवंडी बीटचे सहाय्यक फौजदार गोविंद बडे उपस्थित होते.वृक्षलागवडीत सरपंच बालासाहेब जाधव, ग्रामविकास अधिकारी श्रीराम वीर, डॉ.गणेश ढवळे, सेवा सोसायटी चेअरमन रविंद्र निर्मळ, तसेच बाळकृष्ण थोरात, विक्रांत वाणी, अक्षय वाणी, औदुंबर नाईकवाडे, दादा गायकवाड, सुरेश ढवळे, सुरेश निर्मळ, नाना वाणी, बालाजी निर्मळ, अशोक जाधव, जिवन मुळे, सुखदेव वाणी, शरद भोसले, केशव गिरे यांच्यासह ग्रामस्थांनी सक्रिय सहभाग नोंदवला. या उपक्रमात वड, नांदुरकी पिंपळ, बांबू, करंज, शिसे, लिंब, चिंच आदी विविध प्रकारच्या देशी झाडांची लागवड करण्यात आली.

# बीड जिल्ह्यातील पत्रकारांना घरासाठी जागा उपलब्ध करून द्या

## लोकशाही पत्रकार संघाचे पालकमंत्री अजितदादा पवार यांना निवेदन

**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यातील शेकडो पत्रकारांनी कुटुंबाकडे दुर्लक्ष करून देशाचे व समाजसेवा करण्याचा प्रयत्न केला आहे. त्यामुळे त्यांना आपल्या कुटुंबीयांना राहण्यासाठी घर बांधता आले नाही. परंतु आजच्या काळात आपल्या कुटुंबीयांचे घराचे स्वप्न पूर्ण करता यावे या भावनेतून आणि लोकशाही जिवंत ठेवण्यासाठी सदैव तळमळ करणाऱ्या पत्रकारांची वेदना आणि व्यथा लक्षात घेऊन राज्याचे उपमुख्यमंत्री तथा ज्ञबीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजित दादा पवार यांनी पत्रकारांना घर बांधण्यासाठी जागा उपलब्ध करून द्यावी. या मागणीचे निवेदन लोकशाही पत्रकार संघाच्या वतीने लोकशाही पत्रकार संघाचे संस्थापक अध्यक्ष भागवत वैद्य, मराठवाडा विभागाचे कार्याध्यक्ष आत्माराम वाव्हळ आणि बीड जिल्ह्याचे जिल्हाध्यक्ष साहस आदोडे यांनी दिले.

बीड जिल्ह्याच्या पत्रकारितेला मोठा इतिहास आहे. जनसेवा हीच ईश्वरसेवा माणून या जिल्ह्यातील अनेक गुणी पत्रकार तुटपुंज्या मानधनावर काम करत होते. शिवाय आहेत ही जिल्ह्यातील अनेक



पत्रकारांनी पत्रकारितेमध्ये आपले संपूर्ण आयुष्य वेचले, आपल्या पत्रकारितेच्या काळात या पत्रकारांनी कुटुंबाचा किंवा आपल्या घरातील सदस्यांच्या सुखाचा विचार कधीच केला नाही. आज जिल्ह्यातील विविध दैनिकातील शेकडो पत्रकार वयोवृद्ध झाले आहेत. कित्येक पत्रकारांचे आयुष्य संपले तरीही त्यांना आपल्या कुटुंबीयांसाठी घर बांधता आले नाही. आजच्या काळात पत्रकारांना प्लॉट खरेदी करून घर बांधणे अशक्य बाब झाली आहे. पत्रकारिता करत असताना आपल्या कुटुंबीयांचे घराचे स्वप्न पूर्ण करता यावे यासाठी ही बाब लक्षात घेऊन राज्याचे उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजित दादा पवार यांनी बीड जिल्ह्यातील पत्रकारांना घर बांधण्यासाठी जागा उपलब्ध करून द्यावी या मागणीचे निवेदन दिले. यावेळी अजित पवार यांनी सकारात्मकता दावून जागा उपलब्ध करण्याचे आश्वासन दिले आहे. या निवेदनावर संस्थापक अध्यक्ष लोकशाही पत्रकार संघाचे संस्थापक अध्यक्ष भागवत वैद्य, प्रदेश उपाध्यक्षा हलीमा शेख, मराठवाडा कार्याध्यक्ष आत्माराम वाव्हळ बीड जिल्हाध्यक्ष साहस आदोडे, जिल्हा संघटक संजय कुलकर्णी यांच्या सह्या आहेत.



महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार हे बीड जिल्ह्याच्या दौऱ्यावर आले असता सत्कार करतांना आ.विजयसिंह पंडित, नगरसेवक भिमराव वाघचौरे, बाबुराव दुधाळ, रामसिंग टाक सह आदी.

# तडफदार पँथरचा गरजणारा आवाज दिपक केदार यांचा रक्तदान शिबिराने सिरसाळ्यात वाढदिवस साजरा : आशोक घडवे पाटील

**सिरसाळा । प्रतिनिधी**

आज दिवस म्हणजे आंबेडकरी चळवळीतील एक झुंजार, निडर आणि तडफदार नेतृत्वाचा दिवस क्रांतिकारी नेता, तरुणांचे प्रेरणास्थान, पँथर स्वाभिमानाचे प्रतीक दीपक भाई केदार यांचा वाढदिवस. जातीय व्यवस्थेच्या विरुद्ध आवाज उठवणारा, संविधानाची मशाल घेऊन रस्त्यावर लढणारा आणि न्यायविरुद्ध रंगशिंग फुंकणारा हा तरुण नेता, सामाजिक संघर्षाच्या रणभूमीत सदैव अग्रेसर राहिलेला आहे. तो भाषण करत नाही. तो आक्रमक शब्दाने अन्यायाला उत्तर देतो. केवळ आक्रमकतेसाठी नव्हे. तर जान जाने वाले आणि त्याच्या आणि क्षेत्रफळ प्राप्त झालेले त्यांचे नेतृत्व. नव्या पिढीच्या मनात ठाम स्थान निर्माण करत आहे.

दलित यांकडे ऐतिहासिक संघर्षाच्या परंपरेला पुढे नेणारे दीपक भाई केवळ एक चळवळ आणि एक



नव्या क्रांतीची ऊर्जा बनले आहेत. त्यांच्या नेतृत्वात अनेक सामाजिक प्रश्नावर मोर्चे निदर्शने आणि चर्चासत्रे घडले आहेत. मागासवर्गी वरील अन्याय सरकारची बेफिकिरी पोलीस दंडपशाही आणि ब्राह्मणी सत्ता केंद्राच्या विरोधात त्यांनी आपल्या आवाजात क्रांतीचे स्वरूप मिसळले. त्यांचा आवाज म्हणजे भीमसैनिकांच्या मनातील असंतुसांचा हुकारआहे आज त्यांच्या वाढदिवसानिमित्ताने. त्यांच्याकडे केवळ शुभेच्छा नाही. एक आशा आहे. कि त्यांना सुरु केलेली चळवळ आधिक प्रभावीपणे पुढे जावी. नव्या तरुणाना संघटीत करुन संविधानाच्या मुल्यांतुन न्यायाचा संघर्ष अधिक त्रिव व्हावा आशा या आशादायी नेत्याला निरोगी दिर्घायुषय लाभो. वाढदिवसाच्या आभाळभर शुभेच्छा. सिरसाळा परिसरातील आनेक पक्ष संघटनांनी शिरसाळा येथील रक्तदान शिबिरस उपस्थिती दर्शवली व असंख्य भीमसैनिकांनी रक्तदान करून भाई दिपक केदार यांना शुभेच्छा दिल्या यावेळी या रक्तदान शिबिराचे आयोजक अशोक घडवे (पाटील) महाराष्ट्र कार्याध्यक्ष वशीम शेख बीड जिल्ह्यात महासचिव सुनील कांबळे, माजलगाव ता.आध्यक्ष समाधान बचुटे, केज आकाश रोडे यावेळी रक्तदान करते व भिम सैनिक वाढदिवसानिमित्ताने उपस्थित होते.



## महाराष्ट्र राज्य लोकशाही पत्रकार संघाच्या मराठवाड्यात सह बीड जिल्ह्याच्या पदाधिकाऱ्यांच्या निवडी जाहीर

# मराठवाडा कार्याध्यक्षपदी वाव्हळ तर बीड जिल्हाध्यक्षपदी आदोडे यांची निवड

**बीड । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य लोकशाही पत्रकार संघाच्या मराठवाड्यात सह बीड जिल्ह्याच्या पदाधिकाऱ्यांच्या निवडी जाहीर जाहीर करण्यात आल्या यामध्ये मराठवाडा कार्याध्यक्षपदी आत्माराम वाव्हळ यांची तर बीड जिल्हाध्यक्षपदी संपादक साहस आदोडे यांची निवड करण्यात आली. सर्वस्तरातून वेळी निवडपत्र देऊन पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या. या निवडीबद्दल त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

बीड येथे महाराष्ट्र राज्य लोकशाही पत्रकार संघाची एक विशेष तातडीची आणि अतिशय महत्त्वाची बैठक संपन्न झाली. या बैठकीमध्ये मराठवाड्यासह बीड जिल्ह्याच्या विविध पदाधिकाऱ्यांच्या निवडी करण्यात आल्या. लोकशाही पत्रकार संघाच्या मराठवाडा कार्याध्यक्षपदी श्री.आत्माराम वाव्हळ यांची निवड करण्यात आली. त्यानंतर विविध निवडी जाहीर करण्यात आल्या. डिजिटल मीडियाच्या प्रदेश उपाध्यक्षपदी नितेश उपाध्ये यांची तर डीजिटल मीडियाच्या मराठवाडा अध्यक्षपदी उद्धव मोरे यांची निवड करण्यात आली. मराठवाडा विभागाच्या कायदेशीर सल्लागारपदी ऍड. सुप्रिया सुप्रिया गिरी मॅडम यांची निवड करण्यात आली. त्यानंतर बीड जिल्ह्यातील विविध पदाधिकाऱ्यांच्या निवडी करण्यात आल्या.

यामध्ये बीड जिल्हाध्यक्षपदी दै. सरकार वृतपत्राचे संपादक साहस आदोडे यांची जिल्हाध्यक्षपदी निवड करण्यात आली तर बीड जिल्हा महिला उपाध्यक्षपदी आम्रपाली वाव्हळकर यांची तर संजय देवा कुलकर्णी कुक्कडगावकर यांची बीड जिल्हा संघटकपदी निवड करण्यात आली. त्यानंतर या सर्वांना नियुक्त पत्र देऊन शुभेच्छा देण्यात आल्या. मराठवाडा आणि बीड जिल्ह्यातील नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचे लोकशाही पत्रकार संघाचे संस्थापक अध्यक्ष बी. बी वैद्य, महिला आघाडीच्या प्रदेशाध्यक्षा हलिमा शेख मॅडम यांच्यासह ज्योतीताई तुसांबड यांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या. या बैठकीस बीड जिल्ह्यातील पत्रकार बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सत्ताधाऱ्यांनी माज करू नये आणि प्रशासनाने त्यांचे बटिक होऊ नये : मोहन गुंड

## प्रेमपत्र' म्हणत पोलिसांच्या नोटीसीवर भाई गुंडांचा पलटवार; सत्ताधाऱ्यांवर सोशल मीडियावर सडकून टीका

## अनाधिकृत बॅनर वरून अजित दादाची गाडी अडवण्याचा दिला होता इशारा दिवसभर भाई गुंड पोलिसांच्या नजर कैदेत

**केज । प्रतिनिधी**

उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या बीड दौऱ्याच्या पार्श्वभूमीवर शेतकरी कामगार पक्षाचे राज्य चिटणीस मंडळ सदस्य भाई मोहन गुंड यांनी दिलेल्या इशाऱ्यानंतर केज पोलिसांनी त्यांना भारतीय नागरीक न्याय संहिता (बी.एन.एस) कलम १६८ नुसार नोटीस बजावली. विशेष म्हणजे, ही नोटीस मिळाल्यानंतर गुंड यांनी आणि त्यांच्या समर्थकांनी तिला 'प्रेमपत्र' असे संबोधून सत्ताधारी आणि प्रशासनावर जोरदार टीका केली आहे.

भाई गुंड यांनी ५ ऑगस्ट रोजी माध्यमांशी बोलताना बीड शहरातील अनधिकृत राजकीय बॅनर न हटविल्यास अजित पवार यांच्या गाडीसमोर काळे झेंडे दाखवले जातील, असा इशारा दिला होता. यामुळे कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता असल्याचे कारण देत पोलिसांनी त्यांना नोटीस पाठवली. नोटीसमध्ये वक्तव्य खंडन करण्याचा सल्ला देत, शांतता भंग करणारी कोणतीही कृती टाळण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

गुंड यांना मिळालेली नोटीस ही राजकीय दबावाची प्रतिक्रिया



असल्याचे त्यांच्या समर्थकांचे म्हणणे आहे. दिवसभर सोशल मीडियावर याविषयी टीकेची लाट उसळली होती. भाई गुंड यांनी एका पोस्टमध्ये म्हटले, प्रेमपत्र प्राप्त... सत्ताधाऱ्यांनी माज करू नये आणि प्रशासनाने त्यांचे बटिक होऊ नये, यासाठी आम्ही लढत राहू. ते पुढे म्हणाले, जर क्रांतिसिंह नाना पाटील, अण्णाभाऊ साठे यांच्या विचारांच्या शेतकरी कामगार पक्षाच्या मोजक्या बॅनरला बीड नगरपरिषदेला वावडे वाटत असेल, तर सत्ताधाऱ्यांचे शेकडो बॅनर का सहन केले जात आहेत?

दरम्यान, ३ ऑगस्ट रोजी झालेल्या एका कार्यक्रमाच्या बॅनरवरून हे वादळ निर्माण झाले होते. गुंड यांच्या भूमिकेमुळे या मुद्द्याला राजकीय वळण लागले आणि अखेर शहरातील काही बॅनर बीड नगरपरिषदेला हटवावे लागले. सोशल मीडियावर जिल्हाभरातून कार्यकर्त्यांनी गुंड यांच्या समर्थनार्थ प्रतिक्रिया नोंदवल्या.लाल बावट्याचे कार्यकर्ते चांगलेच संतापलेले दिसून आले आणि अनेकांनी पोलिस प्रशासनाचा निषेध व्यक्त केले. शेवटी, भाई गुंड यांनी पोलिसांना लेखी खुलासा दिल्यानंतर रात्री ८ वा त्यांची सुटका करण्यात आली.

# तलवाडा येथील ब दर्जा प्राप्त असलेल्या तुळजा भवानी मंदिराची दयनीय अवस्था

## आठ वर्षापासून ट्रस्ट चा कुठलाच पदाधिकारी फिरकलाच नाही, जमत नसेल तर राजीनामा द्या व युवकांच्या हातात मंदिर सोपवा

### मंदिराचे पुजारी भक्तीदास रायते राहतात कुटुंबासहित जीव मुठीत घेऊन
### भाविक भक्तातून ट्रस्ट विषयी संताप; दानशूर व्यक्तींनी पुढे येण्याची गरज



**तलवाडा । प्रतिनिधी**

**गेवराई तालुक्यातील तलवाडा येथे महाराष्ट्राचे आराध्य दैवत आई त्वरिता देवी हे मंदीर जागृत देवस्थान म्हणुन महाराष्ट्रात ओळख आहे देवीला दर्शना साठी राज्य सहित पर राज्यातून भाविक भक्त दर्शन साठी येतात तसेच बोललेले नवस फेडतात देवी मंदिर डोंगरावर असल्या मुळे मंदिराला वैभव प्राप्त झाले आहे मात्र देवी दर्शन जात असताना पहिले दर्शन तुळजाभवानी आई चे घेतले जाते हे मंदीर पुरातन काळा पासुन असून आज या मंदिराची दयनीय अवस्था झाली असुन आठ वर्षा पासुन मंदिर मोडकळीस आले आहे तर मंदिराचा काही भाग पडला असुन भाविक भक्त साठी मंदिरात स्वच्छतेची बारा वाजले आहेत तरी भाविक भक्तातून ट्रस्ट विषयी रोष व्यक्त केला जात आहे.**







या बाबत सविस्तर माहिती अशी की, गेवराई तालुक्यातील तलवाडा या गावची ओळख म्हणून महाराष्ट्रात देवी च गाव म्हणून ओळखले जाते गावाला देवी विषय इतिहास आज ही जिवंत आहे जागृत देवस्थान म्हणून बीड जिल्ह्यात ओळख आहे त्वरिता भाविक भक्त जिल्हा तून तसेच महाराष्ट्र तून दूरवरून दर्शनासाठी येतात आज ही वयस्कर मंडळी आज ही सांगतात की देवी दर्शन साठी पहिले दर्शन हे तुळजाभवानी चे घेतले जाते नंतर मारुती मंदिर पाशी असलेले कलाल (पाण्याने भरलेले विहीर) येथे हाथ पाय धुवून नंतर डोंगरा वरती दर्शन साठी जातात मात्र भाविक भक्त ज्या ठिकाणी पहिले दर्शन घेतात त्या मंदिरात आठ वर्षा पासुन भीत पडलेली असुन त्या ठिकाणी पत्र थातुरमातुर लावलेले आहेत मंदिराच्या आजु बाजूच्या परिसर गवताने व्याप लेले असुन साप सारखे विषारी प्राणी निघतात तर त्याच ठिकाणी भाविक भक्ता साठी राहण्यासाठी पत्राचे शेड आहे आज ते कित्येक वर्षा पासुन दयनीय अवस्थातेत आहे त्या ठिकाणी पत्र गळती होत असुन काही पत्रे तर कुजलेले अवस्थेत आहे तर त्याच ठिकाणी पडशी फोडून सर्व दुर उंदीर घुस माती कोरून त्या ठिकाणी खड्डे निर्माण झाले असुन भाविक भक्ताची गैर सोय होत आहे तर पिण्या साठी पाण्याची सोय देखील उपलब्ध नाही स्वच्छतेलय ची तर एवढी अवस्था झाली असुन त्या ठिकाणी भाडे पूर्ण मातीत खचुन गेले आहे देवस्थान समिती अध्यक्ष तसेच पदाधिकारी यांना मात्र काहीच देणेघेणे नसुन कुठलाच सदस्य इकडे डोकून सुद्धा पाहत नाही तर दुसरी कडे भाविक भक्तातून नाराजी व्यक्त होत असुन काही ग्रामस्थ सांगतात की जमत नसेल तर राजीनामा देऊन तरुण पिढीला देवीची सेवा करण्याची संधी द्यावी तरच विकास होईल असे बोलले जात आहे तरी काही वर्षा दानशूर व्यक्तीनी मंदिरासाठी मोठ्या प्रमाणात मदत केली असुन अशीच मदत तुळजाभवानी मंदिराच्या डागडुजी साठी करावी.

#### पुजारी राहतात जीव मुठीत घेऊन

तुळजा भवानी चे मंदिर पुजारी भक्तीदास रायते याचे या वर्षी चे साल असुन ते या मंदिरात देख भाल करतात पहाटे लवकर उठून देवीची आरती तसेच दिवसभर देखरेख करत असताना दिसुन येतात ते आपल्या कुटुंबा सहित मंदिरात राहतात मात्र त्यांना देखील राहायची व्यवस्थित व्यवस्था नसल्याने मेट चटई निव्वा रंगाची अशी बाधून राहत असुन रात्र भर ते जागी असतात त्यांनी सागितले की, एक बोका ला काही तरी रात्री चावले होते तो सकाळी मयत अवस्थेत आढळून आला त्यांनी देखील मंदिराची दुरुस्ती करण्या साठी दानशूर व्यक्तीनी पुढे येण्यासाठी आव्हान केले आहे.

---

## आता मराठा आरक्षण मिळाल्याशिवाय मुंबईहून मराठा समाज परत येणार नाही : आचार्य

**परळी वैजनाथ । प्रतिनिधी**



अंतरवाली सराटीत झालेली चुक पुन्हा करु नका. तुम्ही जर काही भानगड करायला जाल तर त्याची किंमत तुमच्यासह पंतप्रधानांना देखील भोगावी लागेल, असा इशारा मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस यांना दिला आहे. मराठा आंदोलन आणि मराठा आरक्षणाचा लढा देणारे मनोज जरांगे पाटील हे पुन्हा एकदा आंदोलनाच्या पवित्र्यात आहे मराठा सम राज्याच्या वतीने २९ तारखेला मुंबई येथे होणाऱ्या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर मनोज जारंगे पाटील २९ ऑगसट रोजी होणार्या आरक्षणाबाबत मुंबईला निघाच आहे. तरी सर्व मराठा बांधवांनी हाय त्या शिस्तीत आपल्याला निघाचे आहे असे आव्हान परळी मतदारसंघातून ज्यातीत ज्यास्त मराठा व बौध्द मुस्लिम यांनी एकत्र येऊन या मोर्चामध्ये सामील व्हावे ही नम्र विनंती करण्यात येत आहे.
परळी शरद पवार गटाचे पदाधिकारी परमेश्वर आचार्य यांनी केली आहे. मनोज जरांगे पाटील यांनी २९ ऑगस्टला मुंबईला धडक मोर्चाची तयारी सुरू केली आहे. या आंदोलनात आता माघार घेतली जाणार नाही अशी भूमिका त्यांनी घेतली आता आपण मराठा आरक्षण मिळूनच स्वस्त बसणार असल्याचे मनोज जरांगे पाटील यांनी म्हटले आहे. मराठा आरक्षण आंदोलन नेते यांना पाटील यांनी मुंबईला धडक देणार असल्याचे म्हटले आहे. यासाठी परळी तालुक्यातील व सिरसाळा परिसरातील मराठा आरक्षणाला जास्तीत जास्त लोकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन सामाजिक कार्यकर्ते परमेश्वर आचार्य यांनी केले आहे.

---

## स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे शेख खिजर, जयदेव शिगणे यांचा प्रशासनास जीव हवा का?

### बेकायदेशीर अतिक्रमण न हटवल्यास गाव तलावात १५ ऑगस्ट रोजी जलसमाधी

**तलवाडा । प्रतिनिधी**

गेवराई तालुक्यातील तलवाडा येथील गाव तलावाच्या संरक्षण भिती लगट आतिक्रमण धारकांनी मोठ्या प्रमाणात आतिक्रमण करत गाव तलाव फुटन्याची परिस्थिति निर्माण केल्याने गावातील सामाजिक कार्यकर्ते वारंवार शासन आणी प्रशासनाच्या संबंधित विविध विभागाला वेळो वेळी अवगत करत असुन तालुका स्तरीय व स्थानीय प्रशासन या आतिक्रमण धारकांवर कार्यवाही करण्या ऐवजी आर्थिक देवाण घेवाण करुन ऊलट आतिक्रमण धारकांना बांधकाम करण्यास प्रोत्साहित करत असल्याचे वारंवार निदर्शनास येत असल्याने स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे उप युवा जिल्हाध्यक्ष शेख खिजर जैनोदीन व जयदेव शिंगणे यांनी आता जिल्हाधिकारी बीड यांना दिनांक ६/८/२०२५ रोजी निवेदन दिले असुन निवेदनात म्हण्टले आहे की मौजे तलवाडा येथील सरकारी गायरान जमीनी मध्ये असलेल्या पाझर तलावाच्या भिंतीलगट बेकायदेशीरपणे केलेले व आज रोजी करत असलेले अतिक्रमण प्रशासकीय अधिकारी हटवत नसल्याकारणाने आम्ही दिनांक १५ ऑगस्ट २०२५ रोजी त्याच तलावात जलसमाधी आंदोलन करणार आहोत.




निवेदनात पुढे म्हण्टले आहे की, आम्ही दिनांक ३०/६/२०२५ रोजी जिल्हाधिकारी कार्यालय बीड, मा. मुख्य कार्यकारी अधिकारी साहेब जिल्हा परिषद बीड, तहसील कार्यालय गेवराई व पंचायत समिती गेवराई यांना सरकारी गायरान जमिनीमधील असलेल्या पाझर तलावाच्या भिंती लगट असणारे हे बेकायदेशीर रित्या केलेले अतिक्रमण काढणे बाबतीत वारंवार निवेदन दिले होते पण आजपर्यंत कोणतीही कारवाई न केल्यामुळे आम्ही परत दिनांक १५/७/२०२५ रोजी सन्माननीय विभागीय आयुक्त संभाजीनगर यांना निवेदन दिले होते. तरी सुध्दा अतिक्रमण काढण्यात आलेले नाही. वरिष्ठ अधिकाऱ्यांचा लेखी स्वरूपातील सक्त आदेश आल्याशिवाय स्थानीय प्रशासकीय अधिकारी कोणत्याही प्रकारची कारवाई करतच नाहीत हे अगदी स्पष्ट उघड उघड सत्य आहे.
म्हणून मी शेख खिजर जैनोदीन व माझे सहकारी जयदेव शिंगने असे आम्ही दोघांनी मिळुन असा निर्णय घेतला की आम्ही १५/८/२०२५ रोजी तलवाडा येथील सरकारी गायरान जमिनीमध्ये असलेल्या त्याच पाझर तलावात स्थानीय प्रशासकीय आधिकाऱ्यांच्या निष्क्रियतेच्या व टाळाटाळ करण्याच्या चालीविरोधात जलसमाधी घेणार आहोत. दोघांनाही पोहता येत नसल्याकारणाने आमच्या जीवितास कोणत्याही प्रकारची हानी झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी ही प्रशासनाची असेल आमच्या दोघांच्याही कुटुंबातील लोकांची जबाबदारी ही शासनाची राहील व ह्यास संपूर्ण जबाबदार हे प्रशासन राहील. आसे निवेदनाच्या शेवटी निवेदन कर्त्यांनी म्हटले आहे.

---

## वॉकिंग ट्रॅक की डंपींग ग्राऊंड नागरिकांना पडला प्रश्न

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

अंबाजोगाई शहरालगत असलेल्या जोगाईवाडी ग्रामपंचायत हद्दीतील शिवाजीनगर बँक कॉलनी व विद्यानगर या दोन कॉलनीच्या ओपन स्पेस मध्ये सुंदर वॉकिंग ट्रॅक तयार करण्यात आले. स्थानिक नागरिकांच्या पुढाकाराने वृक्षारोपण ही करण्यात आले आहे. ओपन स्पेस मोठे असल्याने येथे लहान मुले विविध खेळ खेळतात. असे असताना ही काही लोक वॉकिंग ट्रॅक मध्ये मोठ्या प्रमाणावर कचरा टाकत आहेत. त्यामुळे या परिसरात सर्वत्र दुर्गंधी पसरली आहे.
जोगाईवाडीतील नागरिकांना पडला प्रश्न आहे की, हे वॉकिंग ट्रॅक आहे की, डंपींग ग्राऊंड अंबाजोगाई शहरालगत असलेल्या जोगाईवाडी ग्रामपंचायत हद्दीतील शिवाजीनगर बँक कॉलनी व विद्यानगर या दोन कॉलनीच्या ओपन स्पेस मध्ये शासन निधीतून सुंदर असे वॉकिंग ट्रॅक तयार करण्यात आले. परंतु, पुर्वेकडील गेटच्या आतील जागेत काही लोक वॉकिंग ट्रॅक मध्ये मोठ्या प्रमाणावर कचरा टाकत आहेत. खरे तर जोगाईवाडी ग्रामपंचायतीच्या वतीने कचरा संकलनासाठी घंटागाडीची चांगली व्यवस्था उपलब्ध करून दिलेली असतानाही काही नागरिक मात्र ग्रामपंचायत प्रशासनाला सहकार्य करण्याऐवजी आपल्या घरातील ओला कचरा आणि सुका कचरा असे वेगवेगळे संकलित न करता तसेच हा कचरा घंटागाडी मध्ये ही न टाकता वॉकिंग ट्रॅकलाच डंपींग ग्राऊंड समजून आणून टाकत आहेत. हे योग्य नाही. काही नागरिकांच्या अशा बेजबाबदार कृतीने परिसरात सर्वत्र दुर्गंधी पसरली आहे. पावसाळ्यात रोगराई वाढू शकते. याची दक्षता म्हणून जोगाईवाडी ग्रामपंचायतीच्या वतीने सदरील कचरा तात्काळ साफ करून श्रावण महिना व सणांच्या पार्श्वभूमीवर शिवाजीनगर बँक कॉलनी व विद्यानगर या दोन कॉलनीच्या ओपन स्पेस मधील वॉकिंग ट्रॅक व परिसर तात्काळ स्वच्छ करावा अशी जनतेतन मागणी होत आहे.



---

## घरफोडी, विद्युतवाहक तार, टायर चोरी करणाऱ्या टोळीचा केला पर्दाफाश

**केज । प्रतिनिधी**

महादेव बाबुराव झंगळे वय ३४ वर्षे रा. शिवाजीनगर कळंबरोड केज ता. केज.जि.बीड यांनी दि.११/०७/२०२५ रोजी पो.स्टे केज येथे फिर्याद दिली की दि.०३/०७/२०२५ रोजीचे रात्री २२.०० ते दि.०४/०७/२०२५ रोजीचे ०५.०० वा दरम्याण मस्साजोग येथील हॉटेल अजिंक्य च्या बाजुस ठेवलेली विद्युत तार तीन ड्रम पैकी अंदांजे १५०० किलो वजनाची तार कोणतरी अज्ञात चोरट्यांनी चोरुन नेली वगैरे फिर्यादीवरुन पो.स्टे केज येथे गुन्हा नोंद झाला होता.
सदर गुन्हयाचे गांर्भीय लक्षात घेवुन समांतर तपास करुन आरोंपीचा शोध घेवुन गुन्हा उघडकीस आणण्यासाठी मार्गदर्शन मा. पो. नि. श्री शिवाजी बंटेवाड यांनी पोउपनि महेश विघ्ने यांना केले. यावरुन आज रोजी पोउपनि विघ्ने हे त्यांचे पथकासह केज उपविभागत आरोपीतांचा शोध घेण्या करीता रवाना झाले. केज पोलीस स्टेशन हद्यीत पेट्रोलिंग करत असताना गोपनीय बामतीदारामार्फत खात्रीलायक माहीती मिळाली की, कन्हेरवाडी येथील विशाल काळे हा त्याचे कडील पिक वाहन क्र.एम.एच.२३ ए.यु.५८९० या गाडीमध्ये चोरी केलेली ॲल्यमीनिअमची तार विक्री करण्याकरीता रात्रीचे वेळी केज येथे येणार आहे अशी माहीती प्राप्त झाली. यावरुन पोलीस स्टाफसह १९.३० वा सुमारास केज साळेगाव रोडवर सदरचे वाहन थांबवुन तपासले



असता सदर वाहनात ॲल्युमिनीअम तारेचे बंडल व चार टायर डिस्कसह व एक मोठे कटर मिळुन आले. वाहन चालक विशाल काळे यास सदरची तार व टायर कोणाचे आहेत असे विचारले असता त्याने सांगितले की सदरची तार व टायर हे चोरीचे आहे असे सांगितले.
यावरुन पोलीस ठाणे केज व युसुफ वडगाव हद्यीत सदर आरोपी व त्याचे साथीदाराने एकुण ०३ ॲल्युमिनीअम तार चोरीचे, ०१ बिअरबार व ०१ टायरचोरीचे खालीलप्रमाणे गुन्हे केल्याचे निष्पन्न झाले आहेत. तार चोरी, पो.स्टे केज गु.र.नं ३९८/२०२५ कलम ३३१ (४), ३०५ (३) भा.न्या. सं प्रमाणे बार फोडीचा गुन्हा ५) पो.स्टे. युसुफ वडगाव गु.र.नं १९४/२०२५ कलम ३०३ (२) भा.न्या. सं प्रमाणे टायर चोरी आरोपीचे ताब्यातुन गुन्हयात वापरलेंले पिक अप वाहन, १२५ किलो ॲल्युमिनीअम तार, चार टायर डिक्स सह व एक कटर असा एकुण ५,३२,५००/- रु चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. सदरची कामगीरी ही मा. नवनीत काँवत साहेब पोलीस अधीक्षक बीड, मा. अपर पोलीस अधिक्षक अंबाजोगाई चेतना तिडके, पो. नि. शिवाजी बंटेवाड यांचे मार्गदर्शनाखाली पोउपनि महेश विघ्ने, पोहवा महेश जोगदंड/१२४९, पोहवा जफर पठाण /२०९१, पोअं बप्पासाहेब घोडके/६५०, चापोहवा गणेश मराडे/११८५ नेमणुक स्था.गु.शा बीड यांनी केली आहे.

---

## सार्वजनिक स्वच्छता गृहाविना आष्टी तालुका!

### महिला, मुलीची होतेय कुचबंना; शहराच्या ठिकाणी सोय करण्याची मागणी

**आष्टी । प्रतिनिधी**



घरोघरी शौचालय असले तरी त्याचा वापर कितपत होतो हे सांगण्याची गरज नाही. त्याचबरोबर घराच्या बाहेर पडल्यानंतर महिला, शालेय विद्यार्थी याची मोठी गैरसोय होत आहे. तालुक्यात कुठेच सार्वजनिक स्वच्छतागृह नसल्याने मोठी कुचबंना होत आहे. किमान शहराच्या ठिकाणी तरी स्वच्छतागृह असावे अशी मागणी केली जात आहे.
आष्टी तालुका हागणदारीमुक्त झाल्याचे कागदोपत्री शासनदरबारी नोंद आहे. पण प्रत्यक्षात काय प्रकार आहे. हे गावोगाव गेल्यावर दिसुन येत आहे. ते सोडा पण तालुक्यात मोठ्या प्रमाणावर शाळा, महाविद्यालय आहेत. प्रवाशी संख्या मोठी आहे. राष्ट्रीय व राज्य महामार्गावरील गावे आहेत. आष्टी, कडा, धामणगांव, धानोरा, दौलावडगांव, लोणी या प्रमुख शहराच्या बाजारपेठा आहेत. नेहमीच या ठिकाणी वर्दळ असते. वास्तविक या शहराच्या ठिकाणी महिला, पुरूष, शालेय विद्यार्थी, प्रवाशी यांच्यासाठी सार्वजनिक स्वच्छतागृह असणे गरजेचे आहे. पण संबंधित विभागाकडून व स्थानिक ग्रामपंचायतीकडून दुर्लक्ष होत असल्याने एकाही शहरात अशी व्यवस्था करण्यात आली नसल्याने महिला, मुलीसह पुरषांची कुचबंना होत आहे. पंचायत समिती स्तरावरून प्रमुख ग्रामपंचायतीना सुचना देऊन सार्वजनिक स्वच्छतागृह उभारण्याची सोय करावी अशी मागणी शिवक्रांती सेनेचे युवक प्रदेश अध्यक्ष दिपक सोनवणे यांनी केली आहे.

#### शहरात जागाच शिल्लक नाही!

शहराच्या ठिकाणी सार्वजनिक स्वच्छतागृह उभारायचे असेल तर जागा सोईच्या ठिकाणी पाहिजे. पण हे स्वच्छतागृह उभारण्यासाठी कडा, धामणगाव, दौलावडगांव, धानोरा, लोणी, यासह अनेक शहरात जागा शिल्लक नसल्याने स्वच्छतागृह उभा करण्यास अडचणी निर्माण होत असल्याचे बोलले जात आहे.

---

## साखळी चोरास झडप मारुन पकडले; स्थानिक गुन्हे शाखेची कामगिरी

**बीड । प्रतिनिधी**



रामकृष्ण लॉन्स बीड येथे मनोज जरांगे पाटील याची सभा होती त्या सभेमध्ये खुप गर्दी होती गर्दीचा फायदया घेवुन चोरानी एकाच्या गळयातील सोन्याची चैन चोरली होती त्याचे फिर्यादीवरुन पोलीस ठाणे शिवाजीनगर गु.र.नं ४१९/२०२५ कलम ३०३(२) बी.एन.एस प्रमाणे दाखल होता. सदरील चोरीस गेलेली सोन्याची चैन चा शोध स्थानिक गुन्हे शाखेचे पथक घेत होती. तांत्रिक बाबीची मदत घेवुन यातील सोन्याची चैन ही अशोक वसंत सदरे यानी चोरल्याची माहीती मिळाली. आरोपीचा शोध सुरु होता परंतु आरोपी मिळत नव्हता. दिनांक ०५.०८.२०२५ रोजी गोपनिय बातमीदारामार्फत माहीती मिळाली की, अशोक वसंत सदरे हा चैन चोर नगर नाका बीड येथे थांबलेला असुन सोन्याची चैन विक्री करण्यासाठी जात आहे अशी माहीती मिळाल्यावरुन स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने त्यास झडप मारुन पकडले व त्याचे पॅन्टच्या खिश्यात चोरीस गेलेली चैन मिळुन आली ती चैन त्याने दिनांक ०१.०८.२०२५ रोजी रामकृष्ण लॉन्स बीड येथे चोरल्याचे कबुल केले आहे. आरोपी अशोक वसंत सदरे, वय ४८ वर्ष, रा. करीमपुरा साळगल्ली, पेठ बीड याचेकडुन सोन्याची चैन किंमती १,८५,००० रु जप्त करुन आरोपी व मुद्देमाल पुढील तपासकामी पोलीस ठाणे शिवाजीनगर याचे ताब्यात देण्यात आले आहे. सदरील कामगिरी हि श्री नवनित काँवत, पोलीस अधीक्षक,बीड, श्री सचिन पांडकर, अपर पोलीस अधिक्षक बीड, पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड, स्थानिक गुन्हे शाखा बीड यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक श्रीराम खटावकर, पोलीस हवालदार विकास राठोड, अंकुश वरपे, राहुल शिंदे, पोलीस अंमलदार आशपाक सय्यद, मनोज परजणे, चालक नितीन वडमारे पोलीस ठाणे शिवाजीनगर येथील दिलीप राठोड, रामकृष्ण रहाडे यांनी केली आहे.

---

## साहित्यरत्न डॉ. अण्णाभाऊ साठे यांचा जन्मदिवस 'संयुक्त महाराष्ट्र चळवळ दिन' म्हणून जाहीर करण्याच्या मागणीचे उपमुख्यमंत्री यांना निवेदन

### रा. काँग्रेसचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ. योगेश क्षीरसागर यांच्या प्रयत्नाने माणिक वाघमारे व शिष्टमंडळाची झाली भेट

**बीड । प्रतिनिधी**

दिनांक ६ ऑगस्ट २०२५ रोजी राज्याचे उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजितदादा पवार नियोजित दौऱ्यावर बीड येथे आले असता, राष्ट्रवादी काँग्रेसचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ. योगेश क्षीरसागर यांच्या प्रयत्नाने साहित्यरत्न डॉ. अण्णाभाऊ साठे गौरव समितीचे प्रदेश निमंत्रक पँथर माणिकराव वाघमारे यांच्या नेतृत्वाखाली धर्मराज मजमुले, दत्तात्रय साठे, कचरू तुपे, देवराज थोरात, शिवाजी वाघमारे, निवृत्ती चांदणे, बबन वाघमारे, राहुल दुनघव, नितीन आडागळे, बापूराव ससाने, तुषार जोगदंड, अमित गायकवाड, आत्माराम वाघमारे यांच्या शिष्टमंडळाने महत्त्वपूर्ण भेट घेतली.
या शिष्टमंडळाने उपमुख्यमंत्र्यांना निवेदन देऊन जोरदार मागणी केली की, आपल्या लेखणी आणि संघर्षातून संयुक्त महाराष्ट्र चळवळीला बळकटी देणारे, आणि आयुष्यभर शोषित, वंचित, शेतकरी, शेतमजूर, मजूर, गिरणी कामगार यांच्या दुःखाचा शब्दबद्ध आवाज बनलेले साहित्यरत्न डॉ. अण्णाभाऊ साठे यांचा जन्मदिवस (१ ऑगस्ट) 'संयुक्त महाराष्ट्र चळवळ दिन' म्हणून जाहीर करण्यात यावा. तसेच त्या दिवशी राज्यभर सार्वजनिक सुट्टी जाहीर करावी, आणि 'समाज भूषण' नावाचा राजकीय व सामाजिक क्षेत्रातील पुरस्कार सुरू करून त्यांच्या कार्याचा गौरव करण्यात यावा, अशी मागणी करण्यात आली. या मागणीला उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला. त्यांनी सांगितले की, मुख्यमंत्र्यांशी यासंदर्भात बोलतो, असे म्हणत शिष्टमंडळाचे अभिनंदन केले.



**अकोला कराराचा ऐतिहासिक संदर्भ**

शिष्टमंडळाच्या मागणीला ऐतिहासिक व राजकीय वजन देण्यासाठी ८ ऑगस्ट १९५३ रोजी अकोला येथे झालेल्या 'अकोला करार' या ऐतिहासिक घटनेचा संदर्भ देण्यात आला. या करारात प्रथमच 'मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र' या मागणीला अधिकृत स्वरूप प्राप्त झाले आहे. साहित्यरत्न डॉ.अण्णाभाऊ साठे यांची जयंती १ ऑगस्ट, आणि अकोला करार ८ ऑगस्ट १९५३ रोजी झाला. या पार्श्वभूमीवर डॉ. साठे यांचा जन्मदिवस 'संयुक्त महाराष्ट्र चळवळ दिन' म्हणून घोषित केला जाणे अत्यंत योग्य ठरेल.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा मोलाचा पाठिंबा**

संयुक्त महाराष्ट्र चळवळीला भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी उघड पाठिंबा दिला होता. त्यानंतर मुंबई येथे संयुक्त महाराष्ट्र परिषद भरवण्यात आली. शेड्युल्ड कास्ट फेडरेशनचे डॉ. भंडारे हे नगरसेवक म्हणून मुंबई महापालिकेत होते. त्यांनी 'मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र' या विषयावर पहिला ठराव मांडला. आचार्य अत्रे आणि इतर सर्व नगरसेवकांनी त्याला पाठिंबा दिला व तो ठराव बहुमताने मंजूर झाला.
हा ऐतिहासिक दस्तावेज आज लपवता येणार नाही. या चळवळीत गोरगरीब, दलित, शोषित, पीडित, मजूर, गिरणी कामगार, शेतमजूर वर्गाचा मोठा सहभाग होता. या पार्श्वभूमीवर डॉ. अण्णाभाऊ साठे यांचा गौरव करणे म्हणजे राज्यातील शोषित-वंचित समाजाचा सन्मान करणे होय, असे मत साहित्यरत्न डॉ. अण्णाभाऊ साठे गौरव समितीचे प्रदेश निमंत्रक पँथर माणिकराव वाघमारे यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे व्यक्त केले आहे.

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT